# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/02/2023 (बुधवार) दुपार


## दुखापत

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील खोब्रावाटी येथे दिनांक १३/०२/२०२३ चे २०.०० वा. ते २०.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— कन्हैया चैतराम डहारे, वय ३६ वर्षे, रा. खोब्रावाटी व आरोपी नामे— 1) रामु मुटकुरे 2) दामु मुटकुरे 3) रंगाबाई मुटकुरे 4) सहादेव लिल्हारे सर्व रा. खोब्रावाटी हे एकाच गावामध्ये राहत असुन यातील आरोपी क्र. १) याने फिर्यादीची सायकल फिर्यादीला न विचारता कुठे तरी घेवुन गेला फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ आरोपीचे घरासमोर जावुन यातील आरोपी क्र. १ याला हटकुन बोलले की यापुढे घरासमोरून अशी चोरी करशील तर दोन कनपटात मारीन असे म्हणताच आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करून फिर्यादी व फिर्यादीच्या भावाला काठीने डोक्यावर, मानेवर मारून जखमी केले तसेच हात बुक्क्याने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ३२३, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मंगेश सोनटक्के ब. नं. ९७८ मो. क्र. ९८३४४५३५६५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा गांगापुर येथे दिनांक १४/०२/२०२३ चे ०१.०० वा. ते ०१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रणय विलास धनविजय, वय २६ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड हा विटा सप्लाय करण्याचे काम करतो त्याने ८ महीन्यापुर्वी यातील आरोपी क्र. १) नामे— शुभम भास्कर काटेले याचे घराचे बांधकाम सुरू असल्याने तिथे १५०००/— रू. चे विटा टाकल्या होत्या परंतु आज पर्यंत ते पैसे मिळाले नव्हते. दि. १३/०२/२०२३ ला फिर्यादीने आरोपी क्र. १ यास म्हटले की माझे विटाचे पैसे दे यावरून आरोपीने एस थ्री बार समोर फिर्यादीस १००००/— रू. दिले व निघुन गेला नंतर आरोपीने फिर्यादीस फोन करून म्हटले की तुझे राहीलेले ५०००/— रू तुला देतो तु घराकडे ये म्हटल्यावरून नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी आपले मित्रासह आरोपीचे घरी गेला असता यातील आरोपी क्र. २) सचिन भास्कर काटेले ३) सतिश भास्कर काटेले तिन्ही रा. गांगापुर यांच्या सोबत झगडा—भांडण करुन शिवीगाळ केली व आरोपी क्र. ३ सतीष ने घरातुन लाकडी काठी आणुन फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले व तुझ्याकडुन जे बनते करून घे अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मनोज वाघ ब. नं ७८२ मो. नं ९४२०७५६७५१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील कृष्णा प्रींटीग प्रेस खापा येथे दिनांक १४/०२/२०२३ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– अनिल एकनाथ गोडबोले, वय ५२ वर्ष, रा. किल्लेपूरा खापा वार्ड क्र नं ०२ हा कृष्णा प्रींटीग प्रेस येथील ओटयावर बसला असता यातील आरोपी नामे– सूरज शांताराम जांगडे वय ३८ वर्ष, रा. ढीवरपूरा खापा हा दारू पीवून तेथे आला व फिर्यादीस म्हणाला कि तु माझ्या भावाला मारले असे म्हणुन शिवीगाळ करून प्लॉस्टीकच्या खुर्ची ने डोक्यावर मारून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातून रक्त निघाले व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ नारायन बोरकर ब. नं १२९७ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत क्वॉटर नं ७१ डब्लुसिएल हवामहल कॉलनी वाघोडा सावनेर येथे दिनांक १४/०२/२०२३ चे १५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– बंडु हरीचंद्र सायरे, वय ५२ वर्ष, क्वाटर नं ७१ डब्ल्युसिएल हवामहल कॉलनी वाघोडा सावनेर व आरोपी नामे– आशिष बंडू सायरे रा. क्वाटर नं ७१ डब्ल्युसिएल हवामहल कॉलनी वाघोडा सावनेर हे वडील व मुलगा असुन आरोपी मुलगा हा घरातील लहानसहान कारणावरून फिर्यादी वडीलांना शिवीगाळ करून पाहूण घेण्याची धमकी देत असतो घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे डयुटी वरून घरी आले असता त्यांना पाहुन आरोपी मुलांनी शिवीगाळी करून पाहुन घेण्याची धमकी दिली तसेच हातभुक्याने मारहान करून बाजुला पडुन असलेला दगड उचलुन दगडाने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक तिवारी मो. नं ९६८६८६१४८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**